**‘ग्रीनअर्थ प्रशिक्षण’**

**कार्यकर्त्यांसाठी**

# ।। ‘धार-दार’ प्रशिक्षण ।।

मनाला धार। कौशल्यांना धार।।
विचारांना, कर्तृत्त्वाला, नेतृत्त्वाला धार।।

**मित्रांनो,**

सस्नेह नमस्कार!

या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्याची इच्छा तुम्ही दर्शवलीत याचं खूप बरं वाटलं. यानिमित्ताने आपण सर्वजण एकत्रितपणे एका प्रक्रियेचा भाग होणार आहोत. या प्रशिक्षणाच्या प्रक्रियेतून फक्त तुम्हालाच नाही तर आम्हालाही खूप काही शिकायला मिळणार आहे.

सामाजिक कामाचं हे क्षेत्र वेगाने बदलतंय... त्याच वेगात आपणही स्वत:ला बदलायला हवं. आपलं काम अधिकाधिक प्रभावी करण्यासाठी, सातत्याने प्रयत्न करायला हवेत. आणि म्हणूनच आपल्या संपूर्ण व्यक्तीमत्वाला धार लावणारं हे धार-दार प्रशिक्षण!

उत्तम कार्यसंस्कृती ही सर्व प्रकारच्या प्रभावी कामांचा आत्मा आहे. ह्या कार्यसंस्कृतीची तत्त्व पाळली तर आपण अधिक चांगलं काम करु शकू. आणि त्यासाठी आपण सर्वच जण काही नियम काटेकोरपणे पाळणार आहोत.

## काही नियम... व्यवस्थापकीय कामकाज सोपं व्हावं म्हणून...

**१. आपण दररोज, अगदी पहिल्या दिवशीही सकाळी ९.०० वाजता प्रशिक्षणाला सुरुवात करणार. ठीक ९.०० वाजता प्रशिक्षण सभागृहाचे दरवाजे बंद होतील. त्यानंतर प्रवेश नाही...**
**... यामुळे आपण सर्वांच्याच एकाग्रतेची काळजी घेणार आहोत.**

**२. प्रशिक्षणाची सुरुवात दि. १६ जानेवारी २००७ रोजी होतेय. त्यामुळे आपण सर्वजण आदल्याच दिवशी म्हणजे दि. १५ जानेवारी रोजी रात्रीपर्यंत प्रशिक्षणाच्या ठिकाणी पोहोचणार आहोत. तशी जेवणाची आणि रहाण्याची व्यवस्था तिथे केलेली आहे.**

**३. शेवटच्या दिवशी, दि. २० जानेवारी रोजी साधारणत: दु. ४.०० पर्यंत प्रशिक्षण संपेल. तुम्हाला तुमचा परतीचा प्रवास सायं. ५.०० नतंर सुरू करता येईल.**

**४. प्रशिक्षणाची १०० टक्के फी या फॉर्मसोबत पाठवता आली तर उत्तम. अगदीच अडचण असल्यास किमान २० टक्के म्हणजे रू. ६००/- इतक्या रकमेचा डी. डी. आधी पाठवता येईल आणि उरलेली रक्कम प्रशिक्षणासाठी येताना डी. डी. च्या रुपात सोबत घेऊन आलात तरी चालेल.**

**आपली कुणाचीच गैरसोय होऊ नये म्हणून सर्व नियोजन, उदा. राहण्याची व्यवस्था, प्रशिक्षण स्थळाचं आरक्षण अशा काही गोष्टी आधीच करायला हव्यात. यासाठी अर्थातच आर्थिक तरतूदही लागतेच. यापुढे सर्व गोष्टी आपण एकत्रितपणे करणार आहोत, मग त्याची सुरुवात आत्तापासूनच का नको? तुम्ही फॉर्मसोबत जी रक्कम पाठवणार आहात, ती अशाप्रकारे उपयोगी पडणार आहे. आपण सगळेजण मिळून आपली गैरसोय होणार नाही याची काळजी घेऊया. शिस्तीचा भाग म्हणून संपूर्ण फी भरून मगच आपण प्रशिक्षणाला सुरुवात करणार आहोत.**

**५. प्रशिक्षणाच्या फी मधे चहा, नाश्ता, भोजन, निवास आणि प्रशिक्षण फी इत्यादींचा समावेश आहे. प्रवासखर्च मात्र आपण आपापला करणार आहोत.**

**६. उत्तम कार्यसंस्कृतीचं पालन करताना काही मूल्य देखील आपण पाळणार आहोत आणि म्हणूनच या प्रशिक्षण कालावधीत आपण कुणीही मद्य घेणार नाही किंवा प्रशिक्षणादरम्यान इतर कोणत्याही व्यसनांचा अवलंब करणार नाही. आपल्या कामाचं पावित्र्य आपणच जपायला हवं ना!**

या प्रशिक्षणातून तुम्हाला संपूर्ण समाधान मिळेल याची जबाबदारी आमची! त्यासाठी तुमच्या सहकार्याचीही गरज आहे आणि तुमच्याकडून ते मिळेल याची खात्रीही आहे. या पत्रामागे प्रशिक्षणामधे सहभागी होण्यासाठीचा नोंदणी अर्ज जोडलेला आहे. तो पूर्णपणे भरुन डी. डी. सह आमच्याकडे पाठवलात की तुमची या प्रशिक्षणासाठीची नोंदणी पक्की. उत्तराच्या प्रतीक्षेत आहे...

एकजुटीची आठवण,

**विंदा बाळ**
**प्रशिक्षण समन्वयक**

टीप :- डी.डी. **'ग्रीनअर्थ सोशल डेव्हलपमेंट कन्सल्टींग प्रायव्हेट लिमिटेड'** च्या नावे काढावा आणि संपूर्णपणे भरलेला फॉर्म डी.डी. सोबत खालील पत्त्यावर पाठवावा...

**विंदा बाळ** - ग्रीनअर्थ प्रशिक्षण, ३२, कल्याण, नटराज सोसायटी, कर्वेनगर, पुणे - ४११००५२.

फोन - (०२०) २५४५०८८१ मोबाइल - ९४२३००३८४२ ई-मेल - grnearth@vsnl.com